पूर्ण, अपूर्ण नीलाताई

मृणालिनी नानिवडेकर

नीला सत्यनारायण

'कोरोना'बळींची संख्या वाढतेय. त्यामुळे काळाच्या उदरात जाणाऱ्या अभागी, अनाम चेहऱ्यांमध्ये बुधवारी सकाळी भर पडली ती निवृत्त सनदी अधिकारी नीला सत्यनारायण यांची. 'कोरोना' त्यांच्या संवेदनशील मनाला खात होताच, आता त्यांची कुडीही लोप पावली... 'कोरोना'च्या करालतेत निमाली. अनेक आठवणी मागे ठेवून. विलक्षण आणि अधिकारपदावरील कर्तृत्ववान महिला असे परिपूर्ण व्यक्तिमत्त्व एकीकडे अन् अभागी मूल पदरी असल्याने भेडसावणारे एक प्रकारचे अपूर्णत्व दुसरीकडे. या दोन टोकांमध्ये बांधलेले जीवन म्हणजे नीला सत्यनारायण.

पोलादी चौकट मानल्या जाणाऱ्या प्रशासकीय सेवेतले अधिकारी खरे तर पड्याआड काम करणारे. निर्णयांची अंमलबजावणी अन् नियमांची खातरजमा करण्यात गुंतलेल्या या अधिकाऱ्यांमधले काही चेहरे मात्र संवेदनशीलतेमुळे, कामामुळे, लेखनगुणांमुळे जनतेसमोर येतात. त्यातल्याच एक नीला सत्यनारायण. १९७२च्या तुकडीतल्या त्या 'आयएएस' अधिकारी. महिलांनी अशा अधिकारपदापर्यंत पोहोचण्याची संख्या त्या काळात अत्यल्प. मांडके कुटुंबातल्या पोलिस अधिकाऱ्याच्या या कन्येचे त्यामुळेच कौतुक झाले. महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याला अधिक गतिमान करण्यात त्या काळी अधिकाऱ्यांची फौज योगदान देई. गृह ,समाजकल्याण, ग्रामविकास अशा महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्या खरे तर साहित्याच्या विद्यार्थिनी. संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांवर प्रभुत्व. मन फायलीतही रमे अन् साहित्यातही. वन विभागाच्या सचिवपदावर आलेल्या अनुभवांचे त्यांनी 'एक दिवस 'जी'वनातला' या पुस्तकात कथन केलेले. विविध खात्यांवर मोहोर उमटवणाऱ्या कामामुळेच निवृत्तीनंतर राज्य निवडणूक आयुक्त हे महत्त्वाचे पद त्यांच्याकडे सोपवले गेले. स्थानिक स्वराज्य संस्थांसारख्या निवडणुकांचे नियमन करणारे हे पद काही अधिकाऱ्यांच्या वागण्याने वादग्रस्त झालेले; पण ते लोकाभिमुख करण्याचे काम नीलाताईंनी केले. या पदावर पोहोचलेल्या त्या पहिल्या महिला.

जबाबदारीची अशी पदे सांभाळतानाही त्यांनी तब्बल १३ पुस्तके लिहिली. तीही तिन्ही भाषांमध्ये. प्रवासवर्णन, कादंबरी, कवितासंग्रह अशा सगळ्याच प्रकारात त्या रमल्या. त्यातले सगळ्यात गाजले ते 'पूर्ण, अपूर्ण' हे आत्मचरित्र. आकाशी हिंडणाऱ्या या 'घारी'चे लक्ष असे ते आपल्या विशेष गरजा असलेल्या मुलाकडे. त्याच्या पालकत्वाची जबाबदारी निभवताना येणारे अनुभव त्यांच्या लेखनात डोकावत. या आव्हानावर मात करण्याची जिद्दही दिसे. 'कोरोना'काळात समाजमाध्यमांवर त्या डायरी लिहीत. 'घुसमट होतेय, तीन महिने झाले आहेत लॉकडाउनला. घरात मतिमंद मुलगा आहे, तो सैरभैर झालाय...' हे त्यातले उल्लेख अस्वस्थ करीत. अशा रीतीने परिस्थितीशी झगडणाऱ्या त्यांच्या कुटुंबाचे भोग संपत नव्हते. त्यातच त्यांना 'कोरोना'ने गाठले. अख्खे कुटुंब रुग्णालयात ही स्थितीही हताशा देणारी ठरली असावी. अखेर झुंज थकली. जीवन संपले. ताई एका कवितेच्या शेवटी लिहितात

माणूस संपत चालला आहे तिथे माझं काव्य जगेल ना ?

नीलाताईंचा प्रवास संपला. पूर्ण, अपूर्ण निमाले, की अपूर्ण आता पूर्णाकारात लय पावले ? 'कोरोना'वर औषध नाही; तसेच या प्रश्नालाही उत्तर नाही.

मनमिळाऊ अधिकारी

मुंबई, ता.१६ : सनदी अधिकारी म्हणून नीला सत्यनारायण यांनी गृह,वनविभाग, माहिती आणि प्रसिद्धी, वैद्यक आणि समाजकल्याण, ग्रामीण विकास यासारख्या अनेक खात्यांत काम केले.

मनमिळाऊ सनदी अधिकारी म्हणून त्यांची ओळख होतीच, मात्र साहित्य क्षेत्रातही त्यांची मुशाफिरी होती. संवेदनशील कवयित्री, स्तंभलेखिका म्हणून त्या लोकप्रिय होत्या.

नीला सत्यनारायण यांनी हिंदी, मराठी, इंग्रजी या तिन्ही भाषांमधून पुस्तके लिहिली आहेत. याशिवाय १५० हून अधिक कविता लिहिल्या. त्यांनी काही मराठी आणि हिंदी चित्रपटांसाठी संगीत दिग्दर्शन केले होते.

भावनिक पोस्ट

उपचार सुरू असताना नीला सत्यनारायण यांनी फेसबुकवर भावनिक पोस्ट लिहिली होती. त्यात त्या म्हणतात की, जवळ जवळ तीन महिने झाले या लॉकडाउनला. आधी भाजीपाला मिळायचा, वाणसामानही मिळायचं आता तेही मिळेनासं झालं. कोणाकोणाला विनंती करुन सामान मागवलं. दूर जायचं म्हटलं तर गाडी हवी. बस तर बंदच आहे. रस्त्यात पोलिसांची भीती. ते आपला अपमान करतील, गाडी जप्त करतील याची धास्ती."

"घरात एक मतिमंद मुलगा. तो सैरभैर झालेला. त्याला कळत नाही की आजूबाजूला काय चाललं आहे, का चाललं आहे. त्याला रोज फिरुन यायची सवय आहे. ती त्याची गरज आहे. त्याला मी समजावू शकत नाही. मला फार हताश वाटतं. आपण एकमेकांशी बोलतो, मित्रांना फोन करतो, त्याने काय करावं? त्याची घुसमट कोणाला समजणार आहे?" अशा भावना नीला सत्यनारायण यांनी व्यक्त केल्या होत्या.

इमारती कोसळून मुंबईत ७ बळी

पान १ वरून

८० वर्षांची जुनी इमारत असून सी- १ कॅटॅगिरीतील होती. इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी म्हाडा- पालिकेने एनओसी दिली होती; मात्र संबंधित इमारतीच्या मालकाने दुर्लक्ष केले. धोकादायक इमारत असतानाही इमारतीत रहिवासीही राहत होते. तळ अधिक पाच मजले असलेल्या या इमारतीत तळमजल्यावर दुकाने; तर वरच्या प्रत्येक मजल्यावर चार कुटुंबे राहत होती.

लॉकडाऊन असल्याने या इमारतीची दुरुस्तीही झाली नाही. इमारतीत बहुतांशी रहिवासी घरीच होते. संध्याकाळी पावणेपाचच्या दरम्यान इमारतीचा भाग पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे खाली कोसळला. त्यात काही जण दबले. उर्वरित इमारतीच्या भागात काही रहिवासी अडकले. अग्निशमन दलाने अडकलेल्या १३ जणांना बाहेर काढले. ही इमारत म्हाडाची होती. २०१९ मध्ये दुरुस्तीची पालिकेने परवानगी दिली होती; तरीही का दुरुस्ती झाली नाही, याबाबत म्हाडा प्राधिकरण चौकशी करेल, असे पालिका आयुक्त चहल यांनी माध्यमांना सांगितले. दरम्यान मालाड मालवणी येथील दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून, बाधित कुटुंबांना प्रत्येकी ५ हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे, असे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी जाहीर केले आहे.

मदतकार्यात अडथळा

लॉकडाऊनमुळे येथील प्रवेशद्वार क्रमांक ५, ६ येथे रस्ते बंद करण्यात आले होते. त्यामुळे जखमींना रिक्षातून रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर स्थानिकांनी विरोध केल्याने रुग्णवाहिकेसाठी मार्ग खोलण्यात आले. ४.१५ वाजता रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली.

मुंबईचे एक पाऊल पुढे..!

पान १ वरून

स्थान मिळवले आहे. बारावी परीक्षेसाठी राज्यभरातून १४ लाख २० हजार ५७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती; तर १४ लाख १३ हजार ६८७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी १२ लाख ८१ हजार ७१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या वर्षी मंडळाचा निकाल ८५.८८ टक्के लागला होता.
यंदा निकालात वाढ झाली असून एकूण निकाल ९०.६६ टक्के लागला आहे.

मुलींचीच बाजी

६,३५,५१९
परीक्षार्थी विद्यार्थिनी

९३.८८
उत्तीर्ण विद्यार्थिनींची टक्केवारी

७,७८,१६८
परीक्षार्थी विद्यार्थी

८८.४
उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी

शाखानिहाय निकाल (टक्क्यांत)

- विज्ञान : ९६.९३
- कला : ८२.६३
- वाणिज्य : ८६.०७

प्रवेशासोबत परीक्षेचा मार्ग आता खडतर

पान १ वरून

शास्त्र आणि कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एमएचटी-सीईटी परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेसाठी राज्यातील पाच लाख २४ हजार ९०७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही परीक्षा ४ जुलै ते ५ ऑगस्टदरम्यान होणार होती; मात्र राज्यात कोरोनाचा वाढता धोका पाहता उच्चशिक्षण विभागाने ही परीक्षा पुढे ढकलली. त्यानंतर या परीक्षांच्या तारखांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागून आहे.

जेईई, नीट आणि सीईटी या अभ्यासक्रमांच्या परीक्षा आयबीपीएस ही एकमेव संस्था घेते. यंदा कोरोनामुळे या परीक्षांचे वेळापत्रक बिघडले असल्याने या संस्थेला सर्व परीक्षा सप्टेंबर महिन्यात घ्याव्या लागत आहेत. जेईई, नीट परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. सीईटी परीक्षांच्या तारखा आणि इतर अभ्यासक्रमांच्या तारखा पाहून सीईटी परीक्षेचे वेळापत्रक निश्चित केले जाणार आहे. सीईटी सेल सीईटी परीक्षा ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात किंवा सप्टेंबर महिन्यात आयोजित करण्यासाठी संस्थेकडे पाठपुरावा करत आहे. त्यानुसार लवकरच सीईटी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर होईल. सीईटी परीक्षा सुमारे १४ दिवस चालेल, असे सीईटी सेलमधील अधिकाऱ्याने सांगितले.

विद्यापीठाच्या महाविद्यालयांची नोंदणी उद्यापासून

बारावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात येते. पदवीच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी नोंदणी करण्याची प्रकिया गुरुवारी रात्री किंवा शुक्रवारी जाहीर होईल, असे विद्यापीठातील अधिकाऱ्याने सांगितले.

गुणवत्ता यादी, कागदपत्र पडताळणीचा पेच कायम

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाची प्रवेश प्रकिया सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागणार आहे. गुणवत्ता यादी पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जावे लागते, तसेच कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालय गाठावे लागते. याबाबत विद्यापीठ स्तरावर पेच असून तो सोडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महाविद्यालयांनी यासाठी ऑनलाईन सुविधा द्यावी, यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले.

ट्विटरच्या चिमण्या हॅकर्सच्या जाळ्यात

पान १ वरून

होता आणि आता तो देण्याची हीच वेळ आहे. माझ्या बिटकॉईन ॲड्रेसवर आलेल्या प्रत्येक हजार डॉलर पेमेंटच्या मोबदल्यात तुम्हाला दोन हजार डॉलर पाठविले जातील. ही योजना फक्त ३० मिनिटे चालेल. चला लाभ घ्या. "

हॅपी वेनस्डे

एलॉन मस्क यांच्या अकाउंटच्या ट्विटमध्ये हॅपी वेनस्डे अशी सुरवात करण्यात आली होती. माझ्या फॉलोअर्सना बिटकॉईन परत देतो आहे. तुमची सर्व पेमेंट दुप्पट होतील. त्यासाठी खालील ॲड्रेसवर पेमेंट पाठवा. ही ऑफर केवळ ३० मिनिटांसाठी आहे.

ट्विटर म्हणते दिवस खडतर

ट्विटरचे सीईओ जॅक डोर्सी यांनी सांगितले की, " आमच्यासाठी आजचा दिवस फार खडतर ठरला. जे काही घडले त्यामुळे आम्हा सर्वांना भयंकर धक्का बसला आहे. आम्ही छाननी करीत आहोत. नेमके काय घडले हे पूर्णपणे कळल्यानंतर ती संपूर्ण माहिती शेअर केली जाईल.

आंतरराष्ट्रीय उड्डाणे उद्यापासून 'अनलॉक'

पान १ वरून

कोविड-१९ च्या उद्रेकापूर्वी देशांतर्गत विमानसेवा सुरू होती. त्याच्या किमान ५५ ते ६० टक्के उड्डाणे दिवाळीपर्यंत पूर्ववत सुरू होतील, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, की अमेरिकी कंपन्यांची १८ विमाने १७ ते ३१ जुलैपर्यंत भारतात येतील. कोरोना काळात २३ मार्चपासून विमानसेवा बंद झाली. वंदे भारत योजना वगळता आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक पूर्ण बंद आहे. वंदे भारत अंतर्गत आतापावेतो ८० हजार भारतीयांना विदेशातून परत आणण्यात आले आहे. यात दुबई व संयुक्त अरब अमिरातीतील सर्वाधिक प्रवासी असून अमेरिकेतील ३० हजार भारतीयांनाही मायदेशी आणण्यात आल्याची माहिती पुरी यांनी दिली.

PIDILITE INDUSTRIES LIMITED
Regd. Office: Regent Chambers, 7th Floor, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021. • Tel: 91 22 2835 7000
Fax: 91 22 2821 6007 • Email: investor.relations@pidilite.co.in
Website: www.pidilite.com • CIN: L24100MH1969PLC014336

NOTICE

NOTICE is hereby given that pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Thursday, 6th August, 2020 to consider and take on record, inter alia, the unaudited financial results for the first quarter ended on 30th June, 2020.

Further, pursuant to Regulation 47(2) of aforesaid Regulations, this intimation is also available on the website of BSE Limited (www.bseindia.com) and National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) where the Company's securities are listed and shall also be available on the website of the Company www.pidilite.com.

For Pidilite Industries Limited

Place : Mumbai — Puneet Bansal
Date : 17th July, 2020 — Company Secretary

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग
नवीन प्रशासकीय इमारत, खोली क्रमांक ३०७
तिसरा मजला, विधान भवनसमोर, पुणे ४११ ००१

''राज्य मागासवर्ग आयोग सदस्य पदभरतीस स्थगिती''

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे या आयोगामध्ये महाराष्ट्र राज्यातील कोकण, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर या महसूल विभागांमधून प्रत्येकी एक सदस्य याप्रमाणे एकूण सहा सदस्यांची नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या अनुभवाधिष्ठित संशोधनाचा अनुभव असलेल्या समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, विधी या विषयांतील तज्ञ व्यक्तींकडून इतर मागासवर्ग (Other Backward Class), विमुक्त जाती (Vimukt Jati), भटक्या जमाती (Nomedic Tribes), सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (Socially and Educationally Backward Class) व खुला (Open) या प्रवर्गातील विनिर्दिष्ठ अर्हताधारक इच्छुक पुरुष व महिला व्यक्तींकडून दिनांक ३१ जुलै २०२० पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. याबाबतची जाहिरात वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली होती.
शासन पत्र क्रमांक- आयोग-२०२०/प्र.क्र.०३/मावक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ अन्वये सदर जाहिरातीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे. कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
डीजीआयपीआर/३७९/२०२०-२१

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
के. सी. मार्ग, वांद्रे रेक्लेमेशन बस डेपोजवळ, वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५०
दूरध्वनी क्र.: ०२२ - २६४००१९०, फॅक्स: ०२२ - २६४१ ७८९३, संकेतस्थळ: www.msrdc.org
म.रा.र.वि.म. E-Tender Portal: http://mahatenders.gov.in, सीआयएन: U45200MH1996SGC101586

ई-निविदा सूचना

कामाचे नाव – मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग –४ (४८) वरील अमृतांजन पुलावरील कि.मी. ७०/०७० ते ७१/३०० मास्टिक अस्फाल्ट वेअरिंग कोटचे काम करणे. (द्वितीय वेळ)
- निविदा प्रस्ताव १७.०७.२०२० पासून ते ३१.०७.२०२० पर्यंत ई – निविदा पोर्टल mahatenders.gov.in वर पाहण्यासाठी / डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहील. निविदा पूर्व बैठक २७.०७.२०२० दुपारी १२.०० वाजता.
- साईट्स संबंधी सर्व तपशील, बयाणा राशी आणि अन्य नियम व अटी इत्यादी, निविदा दस्तऐवज डाऊनलोड करणे आणि ऑनलाईन निविदा जमा करण्याबाबत सूचना http://mahatenders.gov.in वरुन डाऊनलोड केल्या जाऊ शकतात.
- निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ३१.०७.२०२० दुपारी ३.०० वाजेपर्यंत.
- कोणत्याही कारनाने कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार म.रा.र.वि. महामंडळाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

स्वाक्षरी
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
म.रा.र.वि.म. (लि.) मुंबई

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

पर्यवेक्षण विभाग सी 8, बांद्रा–कुर्ला संकुल बांद्रा (पूर्व), मुंबई – 400 051.

बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (एएसीएस), कलम 56 चे वाचन करीता, कलम 35अ अंतर्गत निर्देश कालावधी विस्तार– दी सिटी को–ऑपरेटिव बँक लि., मुंबई,महाराष्ट्र

भारतीय रिझर्व्ह बँकेकडून दिनांक 17 एप्रिल 2018 रोजी दिलेल्या निर्देश सं. DCBS.CO.BSD–1/D–5/12.22.039/2017–18 च्या अनुषंगाने सिटी को–ऑपरेटिव बँक लि., मुंबई, महाराष्ट्र वर दिनांक 17 एप्रिल 2018 ची कार्यालयीन वेळ संपल्यापासून सहा महिन्यांसाठी दिशानिर्देश लादण्यात आले होते. वरील निर्देशांची वैधता वेळोवेळी वाढवण्यात आली होती ज्यामध्ये शेवटी दिनांक 07 एप्रिल 2020 रोजी दिलेल्या निर्देशितसं. DOR.CO.AID.No.D–68/12.22.039/2019–20 च्या अनुषंगाने दिनांक 16 जुलै 2020 पर्यंत वाढविण्यात आली होती.
2. जनतेच्या माहितीसाठी सुचना देण्यात येत आहे की, भारतीय रिझर्व्ह बँक, बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 कलम 56 चे वाचन करीता, कलम 35अ, उप कलम (1) अनुसार,आपल्या प्रदत्त अधिकाराचा वापर करून उपरोक्त बँकेला असा आदेश देत आहे की दिनांक 17 एप्रिल 2018 रोजी दिलेल्या निर्देश सं. DCBS.CO.BSD–1/D–5/12.22.039/2017–18 च्या अनुषंगाने सिटी को–ऑपरेटिव बँक लि., मुंबई, वर दिनांक 17 एप्रिल 2018 रोजी जे दिशानिर्देश लादण्यात आले होते त्याची वैधता वेळोवेळी संशोधित केली होती ज्यामध्ये शेवटी 16 जुलै 2020 पर्यंत ती वाढवण्यात आली होती जी की आता पुन्हा दिनांक 10 जुलै 2020 च्या सुधारित निर्देश सं. DOR.CO.AID.No.D–3/12.22.039/2020–21 द्वारा 17 जुलै 2020 ते 16 ऑक्टोबर 2020 पर्यंत तीन महिन्यासाठी वाढवण्यात आली आहे आणि ती पुनरावलोकनाधीन असेल.
3. संदर्भाधीन निर्देशातील इतर कोणत्याही नियम आणि अटी बदललेल्या नाहीत.
4. दिनांक 10 जुलै 2020च्या सुधारित निर्देशाची प्रत बँकेच्या आवारात जनतेच्या माहितीसाठी लावण्यात आलेली आहे.
5. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उपरोक्त मुदत वाढीमुळे आणि/किंवा निर्देशातील परिवर्तनामुळे जनतेने असे गृहीत धरू नये की, बँकेच्या सुधारलेल्या आर्थिक स्थितीवर भारतीय रिझर्व्ह बँक समाधानी आहे.

(उमाशंकर)
मुंबई — मुख्य महाप्रबंधक

पैशाचे आमिष दाखविणाऱ्या ई–मेल/एसएमएस/फोन कॉल मुळे फसगत होऊ देऊ नका

ठाणे महानगरपालिका, ठाणे
मालमत्ता कर विभाग
जाहीर सूचना

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके जनरेट करण्यांत आली असून, ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरणेकरिता, महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ई सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. या ई-सुविधेमार्फत करदाते त्यांचा मालमत्ता कर ऑनलाईन पध्दतीने जमा करु शकतील व देयकाची प्रिंट घेऊ शकतील. सध्या सुरु असलेल्या कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव व त्याअनुषंगाने लॉकडाऊन, यामुळे बिले प्रत्यक्ष वितरीत करणेकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता, करदात्यांनी महापालिकेच्या उपरोक्त ई-सुविधेव्दारे मालमत्ता कर भरावा. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे करदाते त्यांच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या देयकातील पहिल्या सहामाहीच्या मालमत्ता करासोबत दुसऱ्या सहामाहीचा मालमत्ता कर, अशी संपूर्ण कराची रक्कम महापालिकेकडे जमा करतील, अशा करदात्यांना त्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करामध्ये (अग्निशमन कर वगळता) सूट देण्यात येते. यावर्षी सदरची सूट खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कालावधी	दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करावरील सूट
०१	१५ सप्टेंबर पर्यंत भरल्यास	१०%
०२	१६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर	४%
०३	१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर	३%
०४	१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर	२%

तरी करदात्यांनी / नागरिकांनी या सवलतीचा जास्तीत जास्त फायदा घेऊन, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिताचा मालमत्ता कर प्राधान्याने भरुन, महापालिकेस सहकार्य करावे.
मा.महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने.
ठामपा/पिआरओ/कर/२४३/२०२०-२१ — सही/-
दि:१६.०७.२०२० — उप आयुक्त (कर)
pls visit our official web-site — ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in
संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड
जाहीर सूचना

या सूचनेद्वारे, कळविण्यात येते की,पूर्णवेळ सभासद, सेबी, यांच्यासमोर वैयक्तिक सुनावणी, सेबी भवन - II, प्लॉट नं. सी ७, "जी" ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे खालील बाबतीत निश्चित करण्यात आलेली आहे.
सुप्रिम टेक्स मार्ट लि. संस्थेसाठी (i) फ्युचर फिनट्रेडचे प्रतिनिधित्व प्रियेश मेहता आणि (ii) संतोष गजेंदर सिंग, १४ ऑगस्ट २०२० रोजी दुपारी २.३० वा. करतील.
ट्रान्स्पेक इंडस्ट्री लि. या संस्थेसाठी (i) प्रशांत जयंतीलाल पटेल आणि (ii) अकिरा कन्सल्टंन्सी प्रा.लि, २४ ऑगस्ट २०२० रोजी दुपारी २.३० वा.
प्रतिसादासाठी, जर काही असल्यास bohnimaand@sebi.gov.in येथे पाठवावा. संबधितांसाठी तुम्हाला वेबेक्स ॲप डाउनलोड करण्याची विनंती करण्यात येत आहे. वर नमूद ई-मेल येथे तुम्ही पुरविलेल्या ई-मेल आयडी/मोबाईल क्रमांकावर व्हिडिओ कॉन्फरन्ससाठी वेबेक्स लिंक पाठविण्यात येईल.
दिनांक : १० जुलै २०२० — आशुतोष अरुण
ठिकाण : मुंबई — डेप्युटी जनरल मॅनेजर
davp/१५२०४/११/००४४/२०२१

भारतीय तटरक्षक
(संरक्षण मंत्रालय)

भारतीय तटरक्षक यांना मुंबईमध्ये वरळी, प्रभादेवी, दादर, लोअर परेळ, महालक्ष्मी, बीच कँडी, मलबार हिल, कुलाबा, दक्षिण मुंबई, बांद्रा, कुर्ला परिसर इत्यादींना प्राधान्य देण्यासाठी वरळी समुद्र पुलाच्या अत्यंत जवळ ५० वाहनांच्या पार्किंग सुविधेसह ३०,००० ते ४०,००० चौ.फु. क्षेत्रफळाची जागा कार्यालयासाठी 5 वर्षांसाठी भाडेतत्त्वावर पाहिजे आहे. स्वारस्य असणारे दल ज्यामध्ये सरकारी, सार्वजनिक क्षेत्र आणि स्वतंत्र एजन्सी समाविष्ट आहेत त्यांनी फोटो, चित्रे, नियम आणि अटींसह अपेक्षित भाडे (प्रति चौ.फु. दरमहा कर सोडून) यासह आपल्या संपत्तीचा तपशील दोन वेगवेगळ्या मोहोरबंद पाकिटात दि. १० ऑगस्ट २०२० पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावा.
पत्ता : कमांडर, मुख्यालय संख्या -२, तटरक्षक जिल्हा (महाराष्ट्र), गोल्फादेवी मंदिर मार्ग, वरळी सागर-मुख, मुंबई -४०० ०३०.

davp१०११९/११/०००७/२०२१

अधिक तपशिलासाठी +९१ ९८६९४८११४८/८६९८२२२७७५ वर संपर्क साधावा.

Mahindra LOGISTICS
महिन्द्रा लॉजिस्टिक्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: महिन्द्रा टॉवर्स, पी. के. कुरणे चौक, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
वेबसाइट: www.mahindralogistics.com ई-मेल: cs.mll@mahindra.com
फोन क्र.: +९१ २२ २४९० १४४१ फॅक्स क्र.: +९१ २२ २४९० ०८३३
कंपनी ओळख क्र.: एल६३०००एमएच२००७पीएलसी१७३४६६

जाहिर सूचना

सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५ मधील नियम २९ सोबत वाचले असता नियम ४७ अन्वये, याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की कंपनीचे ३० जून २०२० रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीचे अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित आर्थिक निष्कर्ष, वैधानिक लेखापरिक्षकांच्या मर्यादित पूनर्परिक्षणाअधीन, विचारात घेऊन व त्यांना मान्यता देण्यासाठी महिन्द्रा लॉजिस्टिक्स लिमिटेडच्या ("कंपनी") संचालक मंडळाची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे.
आचारसंहितेच्या अधिन राहून, महिन्द्रा लॉजिस्टिक्स लिमिटेडच्या सिक्युरिटीजचे अंतर्गत ट्रेडिंग होऊ नये म्हणून कंपनीचे ट्रेडिंग विंडो बुधवार, दि. १ जुलै, २०२० ते शनिवार, दि. १ ऑगस्ट, २०२० या कालावधित (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.
सदर सूचना कंपनीच्या https://www.mahindralogistics.com या वेबसाइटवर तसेच स्टॉक एक्सचेंजच्या https://www.bseindia.com आणि https://www.nseindia.com वेबसाइट्सवरही उपलब्ध आहे.

महिन्द्रा लॉजिस्टिक्स लिमिटेडसाठी
सही/-
स्थळ: मुंबई — ब्रिजबाला बटवाल
तारीख: १६ जुलै, २०२० — कंपनी सचिव

संरक्षण मंत्रालय
साहित्य संस्था
एमआय रूम, एलबीएस मार्ग,
घाटकोपर (पश्चिम),
मुंबई -४०००८६

एमआय रूम एमओसाठी (एमबीआय) करार तत्त्वावर सेवा घेण्याबाबत
१. साहित्य अधिक्षक, मुंबई, हे एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पद्धतीवर एमआय रूम, एमओ (एमबी)/एनएसडी सेवरी येथे खाली नमूद पदांसाठी भाडेतत्त्वावर सेवा घेण्यासाठी बायो-डाटा मागवित आहेत. इच्छुक व्यक्तींनी त्यांचे अर्ज, मेडिकल ऑफिसर-इन-चार्ज, एमआय रूम, एमओ (एमबी) नॅवल स्टोअर डेपो, घाटकोपर (पश्चिम) मुंबई, पिन-४०० ०८६ येथे २७ जुलै २० पूर्वी पाठवावेत. संपूर्ण तपशिलासाठी ०२२२५०४३१४२/८४२२८०६२३७/८४२२८२६२४८ येथे संपर्क साधावा. कोविड १९ आजाराकडे पाहाता, ज्या उमेदवारांकडे कामावर येण्यासाठी स्वतःचे वाहन आहे त्यास प्राधान्य देण्यात येईल. त्याबरोबर अर्जाच्या हार्ड कॉपीसह उमेदवारांनी त्यांच्या बायोडाटाची स्कॅन सॉफ्ट कॉपी (drsipol28@gmail.com) येथे पाठवावी.
२. तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	पदे	जागा	अर्हता	अनुभव	वेतन
१	पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी	०१	एमबीबीएस	जनरल मेडिकल प्रॅक्टिसचा किमान ०५ वर्षांचा अनुभव	७५,०००/- प्रति माह
२	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	०१	डीएमएलटी	किमान ०३ वर्षांचा अनुभव	२८,१००/- प्रतिमाह
३	मेडिकल स्टाफ नर्स	०२	एमएनएस	हॉस्पिटलमध्ये कामाचा किमान ०३ वर्षांचा अनुभव	२८,१००/- प्रति माह
४	प्रयोगशाळा अहवाल सहायक	०१	संगणकाच्या ज्ञानासह इंग्रजी टायपिंग स्पीड ४० w.p.m	किमान ०२ वर्षांचा अनुभव	१२,०००/- प्रतिमाह

(डॉ. एस.जे.पोळ)
एम.बी.बी.एस. ए.एफ.आय.एच
मेडिकल ऑफिसर-इन-चार्ज साहित्य अधिक्षकांकरिता
davp १०७०२/११/००१५/२०२१